# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. कन्नड जि. औरंगाबाद
सत्यमेव जयते

जा.क्र.सनिक/कक्ष-२/श्रीस्वासमससंम.माक / प्राधिकृत अ./२८५/२०१८
कार्यालय,सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. कन्नड
दिनांक :- ०५ /०५/२०१८

**वाचा :-**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)

२. सचिव,श्री.स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था मर्या. माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद यांचे पत्र दि.०२/०५/२०१८

**प्रस्तावना :-**

ज्याअर्थी, श्री.स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था मर्या. माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदविण्यात आलेली असुन तिचा नोंदणी क्र. एजिडी/केएनडी/पिआरडी/ एलसीएस/एल/८५३/01 दि. २४/०८/२००१ असा असून सदर संस्थेने कार्यक्षेत्र या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत आहे.

ज्याअर्थी, वाचा क्रमांक २ अन्वये सचिव, श्री.स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था मर्या. माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद यांचे पत्र दि.०२/०५/२०१८ अन्वये या कार्यालयास लेखी कळविलेनुसार संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणुक दि.२४/११/२०१४ झालेली आहे. त्यामध्ये एकुण (१०) समिती सदस्य अविरोध निवडून आलेले होते .त्यापैकी सर्व (१०) समिती सदस्यांनी त्यांचे वैयक्तीक अडचणीमुळे समिती सदस्य/सभासदत्वाचे राजीनामे दिलेले आहेत त्यामुळे संस्थेचे प्रशासकीय कामकाज बंद झाले आहे, त्यामुळे आमच्या संस्थेचे दैनदिन कामकाज करण्यासाठी आपल्या कार्यालयाकडून प्राधिकृत अधिकारी यांची यांची नियुक्ती करण्यात यावी.तसेच संस्थेचे समिती सदस्य निवडणुक बाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात यावी. अशी विनंती या कार्यालयाकडे केलेली आहे.

ज्याअर्थी, सदर श्री.स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था मर्या. माळीवाडा कन्नड ता. कन्नड संस्थेचे समिती सदस्यांनी राजीमाने दिले असल्यामुळे संस्थेत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ(१)(१-अ)(ब-१) नुसार संस्थेच्या समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे क्रमप्राप्त झ ाले आहे आणि,

ज्याअर्थी,महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ(१)(१-अ)(ब-१) मधील तरतुदीनुसार संस्थेवर नवीन संचालक मंडळ गठीत होईपर्यंत संस्थेचे कामकाज पहाण्यासाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## :: आदेश ::

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उमेशचंद्र प्र.हुशे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. कन्नड, श्री.स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था मर्या. माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद या संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. डी.बी.परदेशी सहकार अधिकारी श्रेणी-१ संलग्न, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,ता. कन्नड जि. औरंगाबाद यांची नियुक्ती करीत आहे.

वरील प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी मा. राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण यांचेकडुन संस्थेची निवडणुक प्राक्रिया पुर्ण होईपर्यत किंवा जास्तीत जास्त सहा महीने राहील. सदर कालावधीत प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेचे दैनंदिन कामकाज पहावयाचे आहे तसेच संस्थेची व्यवस्थापन समितीची निवडणूक घेण्याची प्रक्रिया तात्काळ सुरु करावयाची आहे. निवडणूकीनंतर नवनिर्वाचित समितीकडे पदभार तात्काळ हस्तांतर करावयाचा आहे.

सदरचा आदेश आज दि.०५/०५/२०१८ रोजी माझ्या सही शिक्या निशी दिला आहे.

(उमेशचंद्र प्र.हुशे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता. कन्नड

प्रत- १. श्री. डी.बी.परदेशी सहकार अधिकारी श्रेणी-१ संलग्न, सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, ता.कन्नड तथा प्राधिकृत अधिकारी, श्री.स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था मर्या. माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद यांना कळविण्यांत येत की, त्यांनी संस्थेचा पदभार तात्काळ घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२.सचिव, श्री.स्वामी समर्थ मजुर सहकारी संस्था मर्या. माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद त्यांना कळविण्यांत येत की, त्यांनी त्यांचेकडे असलेले संस्थेचे दप्तराचा व मालमत्ताचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

३.शाखाधिकारी,औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा-कन्नड यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था ता.कन्नड